# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्ये एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. राजकुमार ज्ञानोबा चाटे** इतिहास विभाग प्रमुख महिला महाविद्यालय आंबेजोगाई ता. आंबेजोगाई, जि.बीड

---

**प्रस्तावना -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर थोर विचारवंत समाजसुधारक, दलित-शोषित पिडितांचे कैवारी, क्रांतीकारक महापुरूष थोर शिक्षणतज्ञ विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून यांना ओळखले जाते. भारतीय समाजाला विज्ञानवादी आणि मानवतावादी विचारांची एक नवी दृष्टी त्यांनी दिली. भारतीय समाजाला काळोखाच्या गर्भातून बाहेर काढून परिवर्तनाच्या विकासाच्या सूर्यप्रकाशात आणून ठेवणारे युगपुरूष होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वांगीण कार्यात त्यांच्या शैक्षणिक विचारांचा आणि कार्याचा अविस्मरणीय वाटा दिसून येतो. 'शिक्षण हे सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार आहे.' हा मंत्र बाबासाहेबांनी स्विकारला होता. ते स्वत: उच्च विद्याविभूषित होते. एम.ए., पीएच. डी., एल.एल.बी. बार ॲट लॉ, बॅरिस्टर अशा उच्च पदव्या त्यांनी मिळविल्या होत्या. तत्कालीन समाजव्यवस्था जातीयतेने पोखरलेली होती. शिक्षण ही सवर्ण वर्गाची मक्तेदारी असल्याने बहुजणांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. त्याही परिस्थिती अस्पृश्यतेचे चटके सहन करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा ध्यास घेतला. ज्यांचे जगणेच प्रस्थापित व्यवस्थेने नाकारलेले होते, अशा व्यवस्थेच्या गर्तेतून बाहेर यायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे मर्म बाबासाहेबांनी ओळखले होते. त्यांच्या या शैक्षणिक वाटचालीतूनच त्यांची शिक्षण विषयक भूमिका विकसित झालेली दिसून येते.

**शोध निबंधाचे उद्देश -**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदानाचा परामर्श घेणे.

बाबासाहेबांनी आपल्या विविध ग्रंथसंपदेतून सातत्याने शैक्षणिक प्रबोधनाचा प्रयत्न चालविलेला होता. विद्यार्थी वर्गासाठी त्यांचे विचार दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. 'विद्यार्थ्यांनो जागृत व्हा.' या लेखात त्यांनी शिक्षणाच्या काळातील क्षण अन् क्षणाचे महत्त्व विशद केले असून विद्यार्थी जीवनात विद्यार्थी आपले कर्तव्य व जबाबदारी कशी पार पाडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून असते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञान लालसेसंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "जगात एवढे ज्ञान आहे की, एखाद्याने आयुष्यभर जरी शिक्षण घ्यायचे ठरविले तरी फार झाले तर ज्ञानसागराच्या पायथ्याशी गुढघाभर पाण्यात आपण पोहोचू शकू." शिक्षण घेत असताना विद्यार्थी वर्गाने दोन गोष्टी ध्यानात ठेवल्या पाहिजेत. बुध्दीमत्तेत आणि कार्यक्षमतेत आपण कमी पडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच व्यक्तिगत सुखापेक्षा आपला समाज स्वतंत्र, स्वावलंबी व सन्माननीय कसा होईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे असे विचार त्यांनी आपल्या शैक्षणिक विचार मंथनातून व्यक्त केले आहेत. [1]

शिक्षण घेवून तरूणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वत: साठी न करता समाजासाठी केला पाहिजे यावर बाबासाहेबांचा भर होता. शिक्षणाने केवळ स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारली म्हणजे भागले असा संकुचित विचार न करता आपल्या समाजाचा सर्वांगीण उध्दार व्हावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशा पध्दतीची समाजभिमुखतेची जाणीव नव शिक्षितांना करून देण्यास ते विसरत नाहीत. शिक्षण हे दुधारी तलवारीसारखे आहे. ती कशी चालवायची हे ती वापरणाऱ्यावर अवलंबून असते. शिक्षणाने चांगलेही करता येते आणि वाईटही करता येते, हे सांगताना बाबासाहेबानी शिकलेल्या माणसापासूनच समाजाला खरा धोका असल्याची भिती व्यक्त केली होती. कारण, सुशिक्षित लोक इतरांना कसे फसवायचे ते अधिक जाणतात म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुशिक्षित लोकांना आपल्या शिक्षणाचा वापर समाजाच्या भल्यासाठी करा आणि समाज विकासाचे स्वप्न साकार करा असे आव्हान केलेले दिसून येते.[2] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण व्यवस्थेत चारित्र्य आणि विनय याला फार महत्त्व दिले. चारित्र्यहिन व विनयहिन सुशिक्षित माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास बाधा आणत असेल तर तो समाजाला शाप ठरतो. म्हणून शिक्षण शाप की वरदान या प्रश्नांचे उत्तर त्या व्यक्तीच्या चारित्र्य आणि विनयात दडलेले असते असे ते म्हणतात. शिक्षण संस्थेसंदर्भात आपली भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण संस्थेला एक पवित्र संस्था मानली आहे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्याचा जबाबदार घटक जेवढा शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. याची जाणीव ठेवून शिक्षणाचे उदात्त कार्य सुरू ठेवले पाहिजे,अशी त्यांची भूमिका होती. शिक्षकासंदर्भात विचार मांडताना बाबासाहेब म्हणतात, शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू हा शिक्षकवर्ग असतो. तो राष्ट्राचा सारथी असतो. म्हणून बुध्दीमान, उदात्त, निपक्ष:पाती थोर मनाचे शिक्षकच राष्ट्राचा स्वाभिमान उंचावत असतात. म्हणून शिक्षकाचे स्थान इतरांपेक्षा उच्च असते. त्याचे भान ठेवल्यास खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उद्देश सार्थक होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केलेली दिसून येते.[3]

देशातील अस्पृश्यता, गुलामगिरी, अप्रतिष्ठा यांचे चटके बाबासाहेबांनी लहानपणापासूनच सहन केले होते. स्वातंत्र, समता, बंधुत्व यांची महती त्यांनी ओळखली होती. या सर्वांवर मात करायचे असेल तर समाज शिक्षणाच्या बाबतीत जागृत करणे शिक्षणाचा दर्जा सांगताना शिक्षण म्हणजे ज्ञान आणि विवेक यांचा सुरेख संगम होय. ज्ञान उपयोगात आणले नाही तर ते नुसतेचे शोभेचा दागिणा

ठरेल. शिक्षणाची परिणती चरित्रनिर्मितीत झाली पाहिजे. शिक्षण हा राष्ट्रीय उन्नतीचा मुलमंत्र आहे. व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण होय, शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ पशु आहे. अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी व त्यांना जागृत करण्यासाठी, समाजाचा खचलेला आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा समाज शिक्षणाने पुढे आल्यानेच त्याचा विकासस होऊ शकेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. दलित समाजाला शिक्षणाची फार गरज आहे हे ओळखून त्यांच्या शिक्षणाच्या सोईवर भर दिला व त्यांना जागृत करण्यासाठी दिनांक २० जुलै १९२४ रोजी बिहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालये, समाजकेंद्रे, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केली तसेच औद्योगिक आणि कृषीशाळा उघडून दलित वर्गाची आर्थिक स्थिती सुधारणा करणे हे उद्दिष्टे होते. १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेती ची स्थापना केली व दलित वर्ग आणि मुलांना शिक्षण, वस्तीगृह पुरविण्यासाठी मुंबई शासनास आवाहन केले. शासनाने दिलेल्या अनुदानामध्ये खर्च भागत नव्हता म्हणून त्यांनी देणग्या गोळा कराव्या लागत. काही लोकांनी त्यांना वस्तीगृहसाठी जमिनी मोफत दिल्या.[4]

महाविद्यालयीन शिक्षण मुलांना घेता यावे म्हणून १९४५ मध्ये मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. दिनांक २० जून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज व दिनांक १९ जून १९५० ला औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय सुरू केले. मुलांसाठी शाळा, ममहाविद्यालय व वस्तीगृह सुरू करून अस्पृश्य बांधवांना संघटित केले.१९२७ साली तात्कालीन विद्यामंत्र्यांना प्राथमिक शिक्षणाचे महत्व पटवून सांगताना ते प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असं असले पाहिजे की मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत घातली तर त्याचं किंवा तिचं शिक्षण लिहिता वाचण्याच्या अवस्थेपर्यंत राहू नये, तर तो संपूर्णपणे सुशिक्षित होऊनच बाहेर पडावा व पुढील आयुष्यात सुद्धा ज्ञान घेत असावा. प्राथमिक शिक्षणाच्या खर्चावर बोलतांना सांगतात आपल्या प्रातांत शिक्षणावर प्रति व्यक्ती फक्त १४ आणे खर्च केला जातो. सरकारी करातून प्रति व्यक्ति २१७ रूपये मिळतात. तेवढे शासनाने प्राथमिक शिक्षणावर खर्च केले तरी शिक्षणासंबंधी न्याय होईल.

सुशिक्षित तरूणांना मार्गदर्शन करताना बाबासाहेब म्हणतात, 'सुशिक्षित तरूणांनी कोणत्याही कुबड्या न घेता स्वावलंबी जीवन जगावे, स्वत:च्या बुध्दीवर विश्वास तिचा उपयोग करावा, विवेक बुध्दीला शरण जावे. जगात ज्ञानापेक्षा पुज्जनिय असे काहीही नाही. तसेच कोणीही मनुष्य जन्मत:च मंद बुध्दीचा नसतो. तुम्हीच तुमच्या भाग्याचे शिल्पकार आहात. आपल्या विविध लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांनाही शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे, ' महिलांनो आपल्या मुलांना शिक्षण द्या, त्यांच्यात महत्वकांक्षा निर्माण करा त्यांची लग्ने लवकर करण्याची घाई करू नका, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो पितो तो गुरगुरल्या शिवाय राहत नाही.' या विचाराची कास धरण्याचे आवाहन त्यांनी समाजाला केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाविषयीचे उत्कट प्रेम त्यांची ज्ञान संपादन करण्याची जबरदस्त ज्ञानलालसा आणि त्यासाठी पडतील ते कष्ट सोसण्याची त्यांची तयारी अगदी विद्यार्थीदशेपासूनच होती. पावाच्या एका तुकड्यावर व कॉफीच्या एका कपाच्या आधाराने अठरा-अठरा तास अध्ययन करून लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स या जगप्रसिध्द संस्थेत अथक अभ्यास करून डी. एस्सी सर्वोच्च पदवी मिळवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले पुरूष होते. हे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले तर फार मोठा आदर्श त्यांच्यापुढे उभा राहिल यात शंका नाही.[5]

आपल्या शैक्षणिक विचाराला मूर्त रूप देण्यासाठी व गोरगरीब मुलांना शिक्षणाची संधी या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. या संस्थेत प्राचार्य, प्राध्यापकांच्या नेमणुका करताना त्यांनी गुणवतेला विशेष महत्त्व दिले या संदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणतात, माझ्या राजकीय पक्षात मी कोणाचीही नियुक्ती करेन पण शिक्षण संस्थात मात्र गुणी, ज्ञानी आणि लायक मंडळीनांच नेमणार त्यावेळी जातीचा, प्रांताचा किंवा धर्माचा विचार करणार नाही. औरंगाबाद येथे असताना कॉलेजच्या प्रगतीकडे त्यांचे विशेष लक्ष असायचे विद्यार्थी, प्राध्यापक काय वाचतात व कसे शिकवितात हे डॉ. बाबासाहेब मुद्दाम पाहत असत असेच एकदा प्राध्यापक कक्षात बसले असताना इतिहासाचे प्राध्यापक गुप्ते यांना त्यांनी प्रश्न केला. "इतिहास म्हणजे काय मला इतिहासाची व्याख्या एका शब्दात सांगा प्रा.गुप्ते व प्रा. महाजन यांनीही इतिहासाची व्याख्या सांगितली पण ती एका शब्दात नव्हती शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कथन केले. "आज मी तुम्हाला एका शब्दात इतिहासाची व्याख्या सांगतो आणि एकच शब्द त्यांना उच्चारला तो म्हणजे 'बदल' आणि त्या शब्दाच्या अनुरोधाने चेंज म्हणजे केवळ राजकीय बदल नव्हे तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदल म्हणजे इतिहास असे सुरेख वर्णन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.[6]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक तळमळ ही त्यांच्या चळवळीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येते. मुंबई विधिमंडळाचे सदस्य असताना प्राथमिक शिक्षण कायद्यावर 1938 साली प्रखर टिका करताना ते म्हणतात. चरखा हा शिक्षणासाठी माध्यम म्हणून मूलोद्योगाचे प्रतीक म्हणून स्विकारल्याने बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होईल त्यांचा शैक्षणिक दर्जा खालावेल अशी भीती व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी त्यातून शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीची दरी रूंदावेल असे म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1937 साली स्वतंत्र मजूर पक्षाच्यावतीने निवडणूक जाहीरनाम्यात शैक्षणिक प्रश्नाबाबतचे धोरण मांडले होते. पूर्ण आणि सक्तीचे शिक्षण व तांत्रिक शिक्षण यावर त्यांचा विशेष भर होता. शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजात सरकारी मदतीने शिष्यवृत्या देण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन केजी – टू – पीजी अशा सर्व शिक्षणप्रक्रियेबाबत होते. शिक्षण हाच मानवाच्या प्रगतीचा मूलगाभा आहे असा ठाम विश्वास वारंवार व्यक्त करतानाच वंचित समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गरजा भागविले ही सरकारची प्राथमिक कर्तव्ये आहेत हे त्यांनी स्पष्ट केले होते.

आजच्या शिक्षणपध्दतीतील खाजगीकरण, विनाअनुदान अल्प मानधन, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, चारित्र्यहीनता, वेठबिगारी, शिक्षण व शिक्षकांच्या बाबतीत असलेली सरकारची उदासिन धोरणे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.[7]

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांची अत्यंत आवश्यकता आहे असे नमुद करावेसे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात ज्ञान-ज्ञानाशिवाय जगू शकत नाही. तो खरा शिक्षक होय. तसेच शिक्षण हे समाजाभिमुख असायला पाहिजे. शिक्षणानेच समाजातील अंधार दूर होऊ शकतो. शिक्षणाने माणसाला माणूसपण मिळते. व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे. शिक्षण हे समाज परितर्वनाचे साधन आहे. स्त्रीयांनी आपल्या प्रगतीसाठी शिक्षण घ्यायला पाहिजे. शिक्षणामुळे स्त्री आपल्या कुटुंबाचे नाव लौकिक करत असते. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार पाहता आपल्याला असे लक्षात येईल की, त्यांच्या शैक्षणिक विचाराची गरज आज वाटत आहे. शिक्षणाचे आज बाजारीकरण झाले आहे. शिक्षणाचे परिविर्तन होते. जीवनाचा धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक असा सर्वच क्षेत्रामध्ये शिक्षणामुळे परिवर्तन होत असते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. फडके भालचंद्र, फुले आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.2008 पृष्ट127.
2. डॉ जावळे बी.जी, बोधीसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डोळस प्रकाशन मुंबई, 2009 पृष्ट 154.
3. धनंजय कीर, डाँ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन मुंबई, 2008 पृ.146
4 प्रा. बी. आर. जोशी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन पुणे 2007 पृ.89.
5. प्रा. एस.डी. मोरे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजहंस प्रकाशन पुणे 2012 पृ.233
6. प्रा. मोरे दिनेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, अनुपम प्रकाशन पुणे,2013 पृ.169.
7. प्रा.डॉ. खंडेरावजी एस. काळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विविध दृष्टिकोण, प्रथमेश प्रकशन जळगाव 2009 पृ.98